**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २२०/ २००९/ सोलापूर | श्री. रहिम अशमु इनामदार मु. सुमित्रानगर, पो. यशवंतनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर | कार्यकारी संचालक, श्री शंकर सहकारी साखर कारखाना लि. सदाशिवनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर | अपिलीय प्राधिकारी, श्री शंकर सहकारी साखर कारखाना लि. सदाशिव नगर ता.माळशिरस, जि. सोलापूर | कामावरून कमी करून खोटया फौजदारी केस मध्ये अडकवून मानसिक, शाररिक, आर्थिक नुकसान केल्याने भरपाई मिळणेबाबत. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | ९६३/ सोलापूर | श्री. धनंजय मच्छिंद्र नागणे मु. पो. केम, ता करमाळा, जि. सोलापूर | मुख्याध्यापक, महात्मा फुले विद्यालय, वरकुटे खुर्द, ता. इंदापूर, जि. पुणे | सचिव, वरकुटे खुर्द ग्रामविकास प्रतिष्ठान, वरकुटे खुर्द, ता. इंदापूर, जि. पुणे | सन १९९५-९६ मधील सेवक संच, ऑर्डर व शिक्षक हजेरी पत्रक | आवश्यक माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी दि.१४.१०.२००८. च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |
| ३ | १०८४/ सोलापूर | श्री. डॉ. विलास भगवान पाटील ममता हॉस्पिटल, कुर्डुवाडी रोड, | वैद्यकीय अधीक्षक, बार्शी मॅटर्निटी ॲन्ड को- ऑप. हॉस्पिटल, | अध्यक्ष, बार्शी मॅटर्निटी ॲन्ड को ऑप. हॉस्पिटल, बार्शी, | डॉ. सौ. एस. आर. देशपांडे स्त्री रोग तज्ञ, केव्हा पासून सेवेत आहेत, त्याची रूजू झालेली तारीख, नेमणूक आदेश. | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये सदर संस्था सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बार्शी, जि. सोलापूर | बार्शी, (हिरेमठ हॉस्पिटल), जि. सोलापूर | (हिरेमठ हॉस्पिटल), जि.सोलापूर | | समाविष्ट होत नाही.त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

१) वरील तक्त्यातील अपिले अनु क्र. १ ते ३ (२२०/२००९/ सोलापूर,९६३ व १०८४/ सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि ३०.०६.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २२४/ २००९/ सोलापूर | श्री.मकसूद बशीर शेख महिबूब नगर, मु.पो.मोहोळ, जि. सोलापूर | सहायक निबंधक, सहकारी संस्था मोहोळ, जि. सोलापूर | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर | मोहोळ तालुका व्यापारी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, मोहोळ संस्थेकडून कर्ज नसलेबाबतचा दाखला मागवून घेऊन द्यावा. | मूळ अर्जातील मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही,'माहिती' ठरत नाही, सबब दाखल स्तरावर अपील अमान्य करण्यात येत आहे. |
| २ | २५३/ २००९/ सोलापूर | श्री.शिवशंकर विश्वनाथ घोलप मु.महागाव बावी, ता.बार्शी, जि. सोलापूर | विभागीय समाजकल्याण अधिकारी, नागपूर विभाग, नागपूर | अतिरिक्त संचालक, समाजकल्याण संचालनालय, चर्च रोड, पुणे | दि. ०१. ०४. ९५ ते ३१. १२. २००८ या कालावधीत नागपूर विभागाकडून संचालक , समाज-कल्याण पुणे व संचालक, वि. जा. भ. ज. इ.मा.व व वि. मा. प्र. कल्याण संचालनालय, पुणे यांच्याकडे आश्रम - शाळा हस्तांतरण प्रस्तावा बाबतची माहिती. | दि. ०१. ०४. ९५ ते ३१.१२.०८ या काला-वधीत एकही प्रस्ताव सादर केला नसल्याची माहिती जन माहिती अधिकारी तथा विभागीय समाज - कल्याण अधिकारी, नागपूर विभाग नागपूर यांनी दि. ३१.०३.०९ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २५४/ २००९/ सोलापूर | श्री. समाधान गुलाबराव माने मु. पो कव्हे, ता.बार्शी जि. सोलापूर | तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर | तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, सोलापूर | कव्हे-पानगाव पाय-मार्गाचे नकाशातील स्केल प्रमाणे रुंदी व लांबीचे मोजमाप मिळावे. | रस्त्याचे रुंदी मापे नकाशात उपलब्ध नसल्याचे ती पुरविता येत नाही तथापी ज्या सर्व्हे नंबर मधून रस्ता गेल्याचे अपिलकर्त्याचे म्हणणे आहे. त्या मूळ भूमापन योजनेतील टिप्पणीची प्रत पुरविण्याबाबत दिलेल्या सूचना हा अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय व जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक यांनी दि.२६.२.०९ रोजी दिलेले उत्तर योग्य आहे. त्या नुसार आवश्यक तर अपीलकर्त्याने मोजणी–साठी स्वतंत्रपणे अर्ज करावा. |
| ४ | २५८/ २००९/ सोलापूर | श्री. ज्ञानेश्वर तात्याबा वाघमारे १०३७७ / १४, मुस्लीम पाच्छा पेठ, सोलापूर | कर आकारण कर संकलन प्रमुख, महानगरपालिक ा सोलापूर | सहायक आयुक्त (म.), सोलापूर महानगर-पालिका सोलापूर | नळ कनेक्शन सबंधी १ ते ६१ मुद्यांची माहिती. | अपिलीय प्राधिकारी यांचा दि. २४.३.०९ चा निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ५ | ३५३/ २००९/ सोलापूर | श्री.विलास कृष्णा जगदाळे व्दारा सौ. शोभा संदिपान जगदाळे, | सचिव, परितेवाडी विविध कार्यकारी सेवा सह.संस्था परितेवाडी, ता.माढा, | सहायक निबंधक, सहकारी संस्था, माढा, जि. सोलापूर | संस्थेचे एकूण सभासद, सर्व सभासदांची सभासद झाल्याची तारीख, प्रत्येकाच्या नावे असलेले जमीन क्षेत्र. | अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. केवळ अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयाची प्रत सोबत आहे.सदर निर्णयाच्या |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मु. जेऊर, २६८,ज्ञानदीप नगर, ता.करमाळा, जि. सोलापूर | जि. सोलापूर | | | अंमलबजावणी बाबतचा अहवाल अपिलीय प्राधिकारी यांनी दि.३०.७.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा. |
| ६ | ३५४/ २००९/ सोलापूर | श्री. नितीन शहाजी कदम मु. वेळापूर (शेरी नं २), ता.माळशिरस, जि. सोलापूर | माहिती अधिकारी, वसंतराव पवार विधी महाविद्यालय, बारामती, जि. पुणे | अपिलीय अधिकारी, वसंतराव पवार विधी महाविद्यालय, बारामती, जि. सोलापूर | योग्य शुल्क भरून माहिती अवलोकन करून त्या प्रती मिळाल्या वाचना -लयातील पुस्तकांची नावे, लेखक नावे, पुस्तक प्रती. लायब्ररी मधील विधि विषयक मासिके कोणती, पुस्तके खरेदी साठी कोणाकडून रक्कम मिळाली, कशी खर्च केली, लायब्ररी कामाचे दिवस व सुट्टीचे दिवस कोणते. | जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, वसंतराव पवार विधी महाविद्यालय बारामती यांनी दि. २७.४. ०९ रोजी दिलेले उत्तर योग्य आहे असे असताना अशा प्रकारे बारंवार अपिले दाखल करण्याबाबत अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे. |
| ७ | ३५६/ २००९/ सोलापूर | सौ शोभा संदिपान जगदाळे २६८,ज्ञानदिप नगर, मु पो.जेऊर, ता. करमाळा, जि. सोलापूर | सचिव, परितेवाडी विविध कार्यकारी सेवा सह. संस्था परितेवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | सहायक निबंधक, सहकारी संस्था, माढा, जि. सोलापूर | संस्थेचे एकूण सभासद, सर्व सभासदांची सभासद झाल्याची तारीख, प्रत्येकाच्या नावे असलेले जमीन क्षेत्र. | अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. केवळ अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयाची प्रत सोबत आहे. सदर निर्णयाच्या अंमलबजावणी बाबतचा अहवाल अपिलीय प्राधिकारी यांनी दि.३०.७.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ३५७/ २००९/ सोलापूर | श्री.हणमंत दशरथ इंगोले मु.पो. एखतपूर, ता.सांगोला, जि. सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत एखतपुर, ता.सांगोला, जि. सोलापूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला, जि. सोलापूर | दारिद्र्य रेषेखालील शौचालय बांधणा-या किती कुटुंबांना शासनाचे बक्षिस दिले, किती कुटुंबाना देणे बाकी आहे, निर्मलग्राम पुरस्काराचे एखतपूर गावाला जिल्हा परिषद, राज्य शासन व केंद्र शासन यांच्याकडून किती बक्षिसे मिळाली, त्याचा खर्च गावासाठी कशा पध्दतीने केला त्याचा पावत्यासह तपशील व दि २६.१. २००९ रोजीच्या ग्रामसभेच्या इतिवृत्ताची नक्कल व घेतलेल्या ठरावाची प्रत. | अपिलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ९ | ३५८/ २००९/ सोलापूर | श्री.सुधीर रघुनाथ पटवर्धन मु.पो.पंढरपूर, कृपा बंगला, हॉटेल नागालँड मागे, प्लॉट नं २४, सिध्दि-विनायक नगर, जि. सोलापूर | उप शिक्षण -धिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर | दि. २९.९.०८ रोजी दिलेल्या अर्जावर काय कारवाई केली, दि.२२.९.०८ रोजी दिलेल्या अर्जावर कारवाई केली नसल्यास का केली नाही, सौ. रत्न पारखी शिक्षिकेस रजा मंजूर केली आहे काय, कोणत्या नियमाने अशा ५ मुद्यांची माहिती. | संभाव्य कार्यवाहीची माहिती,खुलासा, स्वष्टीकरण मागणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. देय ठरणारी माहिती जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत अपीलकर्त्यास देऊन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | ३५९/ २००९/ सोलापूर | श्री.शरण बसप्पा शिवकांत मुळजे मु.पो. गोंगांव, ता.अक्कल-कोट, जि. सोलापूर | वरिष्ठ लेखाधिकारी, जल स्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, सोलापूर | अपिलीय अधिकारी, जलस्वराज प्रकल्प, जिल्हा परिषद, सोलापूर | जलस्वराज्य प्रकल्पांमध्ये केलेल्या सेवेचे मानधन मिळणेबाबत. | अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत मात्र अध्यक्ष,ग्रामीण विकास क्रिडा व शिक्षण प्रसारक बहु. उद्देशिय संस्था यांना जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाधिकारी जल - स्वराज्य प्रकल्प जिल्हा परिषद सोलापूर यांनी कळविल्याप्रमाणे सबंधित माहिती अपीलकर्त्यास १० दिवसांत उपलब्ध करून द्यावी व पूर्तता अहवाल आयोगास अहवाल सादर करावा. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

वरील तक्त्यातील अपिले अनु क्र १ ते १० (अपील क्र २२४/२००९ सोलापूर, २५३/२००९/ सोलापूर, २५४/२००९/ सोलापूर, २५८/२००९/ सोलापूर, ३५३/२००९/ सोलापूर, ३५४/२००९/ सोलापूर, ३५६/२००९/ सोलापूर, ३५७/०९/ सोलापूर, ३५८/२००९/ सोलापूर, ३५९/२००९/ सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि ३०.०६.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | २२९३+२२९४+२२९५ +२२९६+२२९७+ २२९८/ पुणे | श्रीमती रेणुका अनिरूध्द गोडबोले डी-३, वेंकटेश हेरिटेज ३/४+५ अे, कर्वेनगर, पुणे-५२ | माहिती अधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ प्रिंटींग टेक्नॉलॉजी, पुणे | अपिलीय प्राधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ प्रिंटींग टेक्नॉलॉजी, पुणे |

**मूळ अर्जातील माहितीची मागणी**

**अपील क्र. २२९३** - सेवकांचे आयकर आकारणी तसेच श्री. नारायण वाव्हळ, श्री.सिध्दार्थ बावीस्कर यांचे नियुक्ती दिनांक, शैक्षणिक पात्रता, नियुक्ती वेळी धारण केलेले पद, नियुक्तीच्या वेळी दाखल केलेल्या प्रमाणपत्रांच्या प्रती व पदोन्नतीबाबतचा तपशील इत्यादी

**अपील क्र. २२९४** - सेवकांचे आयकर आकारणी, कपात, भरणा इत्यादी संदर्भातील माहिती.

**अपील क्र. २२९५** - पुणे विद्यार्थीगृह १७८६, सदाशिव पेठ, पुणे-३० या सार्वजनिक विश्वस्त निधी व कार्यकारी संचालक यांचे संदर्भात माहिती.

**अपील क्र. २२९६** - सेवकांचे संदर्भात उदा. यंत्र परिचर, चौथ्या, पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी इत्यादीबाबतची माहिती

**अपील क्र. २२९७** - सेवकांची पात्रता, वेतनश्रेणी, इतर फायदे उदा. श्री. शेख, श्री.वरखडे, गायकवाड यांचे संदर्भातील माहिती

**अपील क्र. २२९८** - सेवकांचे संदर्भात उदा. भाड्याचे जागेबाबत व श्री. विष्णू बोत्रे यांचेबाबत माहिती

## विवेचन

उपरोक्त नमूद अपिलांची निर्गती होण्यापूर्वी अपीलकर्त्या यांनी दि.१७.८.२००८ रोजी आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दिला. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला होता. दि. १७.११.२००८ रोजीचे पत्रान्वये अहवाल प्राप्त झाला असून अपीलकर्त्याचे दि. ११.९.२००८ रोजीचे पत्र सोबत जोडले आहे. माहितीबाबत निराकरण झालेले असल्याचे, संचालका विरूध्दच्या वेतन संदर्भातील व इतर आज अखेरच्या सर्व तक्रारी संपुष्टात येत असल्याचे स्वखुषीने सादर करीत असल्याचे श्रीमती गोडबोले यांनी नमूद केले आहे.

या अपिलांच्या अनुषंगाने पुढील बाबींची समज उभय बाजूंना देण्यात येत आहे :

१. अपीलकर्त्याने त्याच विषयाबाबत अपिले व तक्रारी दोन्ही केलेली आहे. तक्रारीच्या अनुषंगाने अपीलकर्तीने दि. ११.९.२००८ रोजी दिलेले पत्र व त्यावर दि. १०.१२.२००८ रोजी आयोगाने दिलेला निर्णय या सर्व अपिलांबाबतही लागू राहील.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत खुलासा, भाष्य मागता येणार नाही.

३. माहितीची मागणी विस्तृत आहे. अशा बाबतीत अभिलेख अवलोकनाचा पर्याय उभय बाजूंनी स्वीकारणे योग्य राहील.

४. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार त्रयस्थ पक्षाची प्राप्तीकर कपात वगैरे स्वरूपाची माहिती संबंधित व्यक्तींची बाजू स्पष्ट झाल्याशिवाय देता येणार नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील तक्त्यातील नमूद केलेली अपिले (अनु. क्र. २२९३, २२९४, २२९५, २२९६ , २२९७, २२९८ ) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. १७.६.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २४० / २००९/ पुणे | श्री. अर्जून लहानबा सैद मु.पो.सणस-वाडी, ता.शिरूर, जि. पुणे | उपनिबंधक, सहकारी संस्था, शिवाजीनगर, पुणे-५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, शिवाजीनगर, पुणे-५ | पुणे जिल्ह्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांशी संबंधित माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ अन्वये प्रसिध्द करावयाची माहिती तसेच पुणे जिल्ह्या-तील कृषि उत्पन्न बाजार समिती बाबत दि. १ सप्टें. २००७ ते १ सप्टेंबर २००८ या कालावधीत दिलेल्या बातम्या प्रसिध्द झाल्या, याबाबतची आकडेवारी इ. माहिती | अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरूपात आहे. जन माहिती अधिकारी यांनी याबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा/अहवाल आयोगास सादर करावा. |
| २ | २४८ / २००९/ पुणे | श्री. गणीभाई यासिन मुलाणी सेजा स्विट्स, गाळा नं.३, गणेश मार्केट, भाजी मंडई, बारामती, जि. पुणे | निवासी नायब तहसीलदार, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | तहसीलदार, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | मौजे बेलवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे येथील शेतजमीन गट नं.१३५ च्या ७/१२ उताऱ्यावर लासुर्णे, ता.इंदापूर येथील गाव कामगार तलाठ्याने थकबाकीची नोंद करण्या-साठी पतसंस्थेने सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती | अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २७७/ २००९/ पुणे | श्री.सूर्यकांत बाबूराव वाळके रो हाऊस नं.३ ए, लक्ष्मी निवास, स.नं.४९/१२, घोरपडी इंडस्ट्रियल हाऊस शेजारी, पुणे-३६ | उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (२), पुणे-५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, शिवाजीनगर, पुणे-५ | लक्ष्मी निवास संस्थेतील अध्यक्ष व सचिव यांची पदे रद्द करून प्रशासकाची नेमणूक करणे संदर्भात कागद पत्रांची मागणी | अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच विहित(रू. २०/-) मुद्रांक शुल्क लावलेले नाही. माहिती संस्था स्तरावरील असून संबंधित गृहरचना संस्था माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. |
| ४ | २७८/ २००९/ पुणे | श्री. महादेव भगवान लोंढे मु.पो.गागरगाव ता.इंदापूर, जि.पुणे | सहाय्यक मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, पुणे | मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, पुणे | सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर येथील श्री. पवार, अधीक्षक अभियंता व श्री. बहीर कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज व श्री. एस. बी.कुलकर्णी यांच्या कार्यकाला - बाबतची माहिती, त्यांच्याबाबतच्या तक्रारी, त्यांनी केलेली कामे इ. ची माहिती | अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ५ | २७९/ २००९/ पुणे | श्री.महादेव भगवान लोंढे मु.पो.गागरगांव ता.इंदूपर , जि.पुणे | सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, पुणे | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, पुणे | सार्वजनिक बांधकाम उपविभाग कोरेगाव कार्यालयात मार्च २००७ ते दि.१.१ २००९ अखेर करण्यात आलेली पूर्ण, अपूर्ण कामे, आवक-जावक नोंदवह्या, तक्रारी, ऑफिस व्यवस्थापन, टी.ए.डी.ए. गेस्ट हाउसवर झालेला खर्च इ. बाबतची माहिती | अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | २८०/ २००९/ पुणे | श्री.महादेव भगवान लोंढे मु.पो.गागरगांव ता.इंदूपर , जि.पुणे | सहाय्यक मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, पुणे | मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, पुणे | सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१, पुणे येथील उप अभियंता श्री. लिंगावार यांच्या बाबतच्या तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती | अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ७ | २८१/ २००९/ पुणे | श्री. अनंत मारूती शिंदे ३३, जेधे नगर, बिबवेवाडी, पुणे-३७ | जन माहिती अधिकारी तथा मंडई अधिकारी पुणे महानगर-पालिका, पुणे | उप आयुक्त (गवनि) पुणे महानगर-पालिका, पुणे | सन १९६१ च्या पानशेत पुरग्रस्तांचे निरनिराळया म्युनिसिपल कॉलनीमध्ये करण्यात आलेल्या पुनर्वसनाबाबत, तसेच कॉलनी क्र.११ मध्ये चालू असलेल्या बेकायदेशीर उद्योग धंद्याबाबतची माहिती | अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ८ | २८९ / २००९/ पुणे | श्री. अजय पांडुरंग पाटील ३०२, केदारनाथ हौसिंग सोसायटी, काविळतळी, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी | जन माहिती अधिकारी उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे-१ | अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे-१ | उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे-१ कार्यालयात करण्यात आलेल्या वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या भरतीच्या अनुषंगाने एकूण ८ मुद्दयांबाबतची माहिती | अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती दिली आहे. उर्वरित माहितीसाठी शुल्क कळविले आहे. |
| ९ | २९१/ २००९/ पुणे | श्री. संजय जयराम धुतमल ४७४/१, डॉ.आंबेडकर नगर, देहूरोड, ता.हवेली, जि.पुणे | परिमंडल अधिकारी, अ विभाग, निगडी, पुणे-४४ | अन्न धान्य वितरण अधिकारी, ए ब्रॅक, सेंट्रल बिल्डिंग, पुणे-१ | श्री.वैशाली वाघमारे व श्री.ए.एस.मोरे हे परिमंडल-अ कार्यालयात रूजू झालेपासून वाटप करण्यात आलेल्या केशरी, शुभ्र व पिवळ्या शिधा पत्रिकांची संख्या, लाभार्थीची नाव पत्त्यासह माहिती व शिधा पत्रिका वाटप करताना लावण्यात आलेले निकष | अपील अर्जासोबत विहित (रू.२०/-) मुद्रांक शुल्क लावलेले नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाच्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

वरील तक्त्यात नमूद केलेली एकूण ९ अपिले (अपील क्र. २४०/२००९/पुणे ; २४८/२००९/पुणे ; २७७/२००९/पुणे; २७८/२००९/पुणे ; २७९/२००९/पुणे; २८०/२००९/पुणे; २८१/२००९/पुणे; २८९/२००९/पुणे ; व २९१/२००९/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २३.६.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २४५७/ पुणे | श्री. गंगाभिसन भाई ओझा शिवाजी चौक, दौंड, ता.दौंड, जि. पुणे | तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, दौंड, ता. दौंड, जि. पुणे | अधीक्षक, जिल्हा भूमि अभिलेख, पुणे | मौजे दौंड शहर येथील सि.स.नं. १५३३ ते १५४३ या भाडेपट्याने दिलेल्या जमिनीची खरेदी विक्री होईल का, इत्यादी | माहिती देण्यात आल्याचे आढळून येते. |
| २ | २८४४ / पुणे | श्री.हेमंत घन:शाम चोपडे रा. सोमवार पेठ, पोलीस वसाहत,सि.नं. ३, रुम नं.८, पुणे-११ | उपसंचालक (नाहसं) समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | सह संचालक (शिक्षण), ) समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | दि. १६.९.२००८ रोजी बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमान्वये तक्रार नोंदविण्यास गेलो असता पोलीस निरीक्षक यांनी तक्रार नोंदवून घेण्यास नकार दिला. | सदर विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी तक्रारीच्या चौकशीबाबतची माहिती ८ दिवसात अपीलकर्त्यास देऊन तसे आयोगास अवगत करावे. |
| ३ | २७९३/ पुणे | श्री. कैलास बापू आबनावे स.नं.५३/१६, विकास नगर, | नगर उप अभियंता (बांधकाम नियंत्रण) | उपायुक्त, विभागीय कार्यालय, पुणे-४, महानगर- | स.नं.५४ पासून स.नं.५३ पर्यंत असणाऱ्या बांधकामाची | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१५.९.२००८ रोजी दिलेला |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | वानवडी, पुणे-४० | विभागीय कार्यालय क्र.४, महानगरपालिका, पुणे | पालिका, पुणे | माहिती | निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ४ | ३१२४/ पुणे | श्री. सुनील सिताराम सुबंध मु.पो.वडगांव-निबांळकर, ता.बारामती, जि. पुणे | उप निबंधक, सहकारी संस्था, (नागरी बँका) सहकार आयुक्त कार्यालय, पुणे-१ | अप्पर अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | नागरी सहकारी बँकाना माहितीचा अधिकार लागू असल्यासंबंधी परिपत्रकाच्या नकला | जन माहिती अधिकाऱ्यांनी योग्य माहिती दिली आहे. अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय कायम करयात येत आहे. |
| ५ | २८४५/ पुणे | श्री. शांताराम तात्याबा काळे रा.घोडेगाव, ता.आंबेगाव, जि. पुणे | निवासी नायब तहसीलदार, घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे | तहसीलदार, घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे | दि. ११.६.२००७ रोजीचे अर्जाप्रमाणे किती दिवसात कारवाई होणार, न्याय मिळेल का ? तेवढीच जमीन आहे का ? | मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी दि. ८.८.२००८ रोजीचे पत्रात नमूद केलेला मंडलाधिकारी, घोडेगाव यांचा अहवाल अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावा व आयोगास अवगत करावे. |
| ६ | ३१२५/ पुणे | श्री. रामदास वाल्मिकराव जंगम रा. ४, पूजा कॉर्नर, भाईनगर, चिंचवड, पुणे-३३ | दुय्यक निबंधक, हवेली क्र.५, पिंपरी चिंचवड, कामिनी हॉटेल शेजारी, चिंचवड गाव, पुणे | जिल्हा सह निबंधक तथा जिल्हाधिकारी मुद्रांक, पुणे शहर, बी.जे. मेडिकल लेडीज हॉस्टेल मागे, पुणे | दस्त ऐवज क्र.६८८/९२ व ६८९/९२ फोटो करिता दस्त मिळाले नाहीत. केव्हा मिळतील ? | मूळ दस्ताचे मागणीसाठी स्वतंत्र नियमानुसार संबंधिताकडे अर्ज करावा. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यात नमूद केलेली अनु.क्र. १ ते ६ अपिले (क्र. २४५७, २८४४, २७९३, ३१२४, २८४५ व ३१२५) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. १६.६.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २४८१/ पुणे | श्री. गणेश गबरू पवार तुळजाभवानी नगर, स.नं.५५/२, दर्गा रोड, चंदननगर, पुणे-१४ | कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे प्रकल्प विभाग क्र.६, कृष्णा-नगर, सातारा व कार्यकारी अभियंता, सीना माढा प्रकल्प विभाग, भीमानगर, ता.माढा, जि. सोलापूर | अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे-११ | जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालया -विरूध्द प्राप्त तक्रारींच्या छायांकित प्रती, निविदा, सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्या त्या वृत्त -पत्रांच्या पूर्ण पानांच्या छायाप्रती, निविदा प्रसिध्दीपूर्व जिल्हा माहिती कार्यालयाशी केलेल्या पत्र व्यवहाराच्या छायाप्रती | अपीलकर्त्यांने एकाच अर्जाद्वारे एकापेक्षा जास्त जन माहिती अधिकाऱ्यांशी संबंधित माहिती मागितली आहे. अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१६.५.२००८ रोजी दिलेल्या आदेशानुसार तयार माहिती निःशुल्क स्वरूपात अपीलकर्त्यास पोस्टाने पाठवावी. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २<br>३ | २५९३+ २५९४ / पुणे | ॲड. विकास जोशी साई सदन, फ्लॅट नं.२९, ४ था मजला, पुण्याईनगर, धनकवडी, पुणे-४३ | नगर उप अभियंता, (बांधकाम नियंत्रण), पुणे महानगरपालिका शिवाजीनगर, पुणे-५ | उपायुक्त क्र.३, पुणे महानगर पालिका, शिवाजीनगर, पुणे-५ | मौजे मुंजेरी येथील स.नं. ५५०/४ च्या बांधकाम परवानगी बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ४७ अन्वये मा. मुख्यमंत्र्याकडे झालेल्या सुनावणी प्रकरणांचे निरीक्षण | मागणी प्रमाणे माहिती मिळाली असल्याचे अपीलकर्त्याने लेखी दिले आहे. |
| ४ | २७३७/ पुणे | श्री. मार्तंड निळकंठ खरे ७, सागरदिप कॉम्प्लेक्स, २३४, नवी पेठ, पुणे-३० | सचिव, खरेवाडी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, आनंदनगर, पुणे-४११ ०५३ | उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), साखर संकूल, शिवाजीनगर पुणे-५ | सन १९७२ ते ऑक्टोबर २००८ या कालावधीतील खरेवाडी सह. गृहरचना संस्थेच्या संदर्भातील एकूण १५ मुद्दयांबाबतची माहिती | अपीलकर्त्यास उपलब्ध माहिती ३० दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२५.२.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | २७४४ /पुणे | श्री. दिवाकर विरराघव राव फ्लॅट नं.१४, शालिनी अपार्टमेंट, सांगवीनगर, औंध, पुणे-७ | सह दुय्यम निबंधक, क्र.२ बिबवेवाडी, पुणे | सह दुय्यम निबंधक, (वर्ग-१), मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, ५, फायनान्स रोड, शासकीय छायाचित्र | दस्त क्र.५२०६/९१ हा दस्तऐवज व सदर दस्ताची सूची क्र.२ मिळणेबाबत | मूळ दस्त कार्यालयाच्या अभिलेख कक्षात आढळून येत नसल्याने अपीलकर्त्या कडील अपार्टमेंट डीड ची छायाप्रत व त्या |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोंदणी कार्यालय इमारत, १ला मजला, पुणे-१ | | सोबतचे दस्तासंबंधीचे इतर पुरावे घेऊन घोषणापत्राचा दस्तऐवज नोंदून अपीलकर्त्यास देण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २४.२.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | २७४६/ पुणे | श्री. विरेंद्र कुमार दिक्षीत फ्लॅट नं.९, शालिनी अपार्टमेंट, सांगवीनगर, औंध, पुणे-७ | सह दुय्यम निबंधक, क्र.२ बिबवेवाडी, पुणे | सह दुय्यम निबंधक, (वर्ग-१), मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर, ५, फायनान्स रोड, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय इमारत, १ला मजला, पुणे-१ | दस्त क्र. १५९३९/९१ हा दस्तऐवज व सदर दस्ताची सूची क्र.२ मिळणेबाबत | |
| ७ | २८०२ / पुणे | श्री. वैजीनाथ ज्ञानोबा परतापुरे द्वारा महेश पारगे, श्रद्धा निवास, चाळ नं.१००/१, पर्वती दर्शन, पुणे-९ | सहाय्यक वनसरंक्षक (प्रा.)वनसरंक्षक पुणे वन विभाग, पुणे यांचे कार्यालय, सेनापती बापट मार्ग, पुणे-४ | वनसरंक्षक, पुणे वन विभाग, पुणे यांचे कार्यालय, सेनापती बापट मार्ग, पुणे-४ | वृत्तपत्रातून जाहिरात देऊन वनसरंक्षक पदाच्या भरण्यात आलेल्या भरतीच्या अनुषंगाने माहिती | अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती चार दिवसांत देण्यात येत असल्याने अपील निकाली काढणेबाबत एकमत झाल्याचे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २४.२.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अनु.क्र. १ ते ८ अपिले (क्र. २४८१, २५९३, २५९४, —, २७३७, २७४४, २७४६ व २८०२/ पुणे) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र.२४८१, —, २७३७, २७४४, २७४६ मध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती देण्याबाबत नमूद /आदेशित केले आहे, त्यानुसार संबंधित अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती देऊन अनुपालन अहवाल आयोगास आठ दिवसात सादर करावा. अशी पूर्तता न केल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

पुणे
**दि. १७.६.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
राज्य माहिती आयुक्त,
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.श्रीकांत विनायक ढोले,
४५, गिरीजा सोसायटी,
एम.आय.टी. जवळ,
कोथरुड, पुणे -४११ ०३८

**अपीलकर्ता**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष.),
पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी तथा**
उप आयुक्त (जनरल.),
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५१ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.०६.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०५.१०.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२६.१०.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.-- |

६ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

घर मालकाने निवासी जागेचा वापर व्यवसायासाठी केला असेल तर त्या ४०% वजावट मिळकतीवरील करपात्र रक्कम ठरवणेसाठी देणे / न देणे याबाबत नक्की नियम असल्यास सन २००३-२००४ या काळातील दुरुस्तीसह माहिती मिळणेबाबत

## विवेचन

अपीलकर्ता श्री.श्रीकांत विनायक ढोले,४५, गिरीजा सोसायटी, एम.आय.टी. जवळ कोथरुड, पुणे -४११ ०३८ यांनी जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (जनरल), पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे कर आकारणी व कर संकलनाबाबत माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली. तथापि श्री.ढोले यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि.), पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यांनी केलेल्या स्पष्टीकरणानेही समाधान न झाल्याने श्री.ढोले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अन्य ठिकाणाहून माहिती मिळाली असल्याने अपील निकाली काढण्याची विनंती अपीलकर्त्याने पत्रान्वये केली आहे. यास्तव आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक :** २४/०६/२००९

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.दत्तात्रय पर्वतराव जगताप
सोनपर्व, पासलकर वसाहत,
लिंगाळी रोड, दौंड, ता.दौंड, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
दौंड तहसील कार्यालय, दौंड,
ता.दौंड, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
दौंड तहसील कार्यालय, दौंड,
ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५८८ / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.२४.०२.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.०८.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१२.०९.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०४.०९.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि..११.११.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - श्रीमती तुळसाबाई धर्माजी झांबरे व श्री. लक्ष्मण महादू डोईजड, दोघेही रा.दौंड यांनी मंडल अधिकारी यांच्यापुढे दिलेल्या जबाबाच्या प्रती. | |

**विवेचन**

अर्जदार श्री.दत्तात्रय पर्वतराव जगताप यांचे मूळ अर्जानुसारची माहिती दि.१२.०९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. तथापि, मंडल अधिकारी यांनी घेतलेले जबाब चुकीचे आहेत. ते मान्य नाहीत, या कारणावरुन श्री.जगताप यांनी दि.१७.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल

केले. तसेच संदरहू जबाब वस्तुस्थितीशी धरुन नाहीत. त्यांची चौकशी होऊन पंचनामा करावा, अशी मागणी श्री.जगताप यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलामध्ये केली आहे.

उपरोक्तनुसार माहिती मिळण्याबाबत श्री.जगताप यांची तक्रार असल्याचे दिसत नाही. केलेल्या कार्यवाहीमध्ये जबाब दुरुस्ती करण्याबाबतची मागणी ही प्रशासकीय स्वरुपाची आहे. सदर मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. याबाबत अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानुसार योग्य त्या न्यायालयात दाद मागता येईल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. : 30 -०६-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेली खालील अपिले निकाली काढण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २६/२००९/ सातारा | श्री. अनिल जगन्नाथ सुभेदार रा.दहिवडी, ता.माण, जि.सातारा | अव्वल कारकून .(अपील शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा | अपर जिल्हाधिकारी, सातारा | अपर जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे आरटीएस/२ हे अपील क्र.११०/२००६ संदर्भात श्री.भालचंद्र गोपाळ सुभेदार व त्यांचे विधीज्ञ यांनी सादर केलेल्या खोटया प्रतिज्ञा पत्राबाबत अर्जदाराने दिनांक १२.४.२००७ रोजी केलेल्या अर्जावर कोणती कारवाई केली ? कोणती कारवाई करावयास पाहिजे होती ? | अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे. अपिलीय प्राधिकारी यांचा दिनांक १६.३.२००९ चा आदेश कायम करण्यात येत आहे. |
| २ | २७/२००९ / सातारा | श्री. श्रीरंग भाऊ थोरात मु.पो.कार्वे, ता.कराड, जि.सातारा | नायब तहसीलदार कराड यांचे कार्यालय, कराड, जि.सातारा | तहसीलदार कराड, जि.सातारा | कोणत्याही एका सर्व्हे नंबरच्या एका बाजूच्या सरबांधाने जर सरकारी रस्ता नकाशात असताना तहसीलदारांना त्याच सर्व्हे नंबरच्या दुस-या सरबांधाने रस्ता देण्याचा अधिकार आहे का ? | जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २.२.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली आहे. |
| ३ | २९/२००९/ सातारा | श्री. सुधीर पांडुरंग चांडोळे अलेरी हायस्कूल-जवळ, गाळा क्र.डी-२६/२, मु.पो.अलेरी, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी | अधिक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ यांचे कार्यालय कृष्णानगर वसाहत, सातारा | अधिक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, कृष्णानगर वसाहत, सातारा | श्री. जी. ए. कुलकर्णी व श्री. डी. आर. बोरगावे यांचे शासकीय कामे केल्याची नोंद घेतेलेले गोपनीय अहवाल | अन्य व्यक्तींचे गोपनीय अहवाल त्रयस्थ व्यक्तींना न देण्याचा जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनुक्रमांक १ ते ३ ( अपील क्रमांक २६/२००९/सातारा, २७/२००९/सातारा व २९/२००९ /सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०-०६-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २६२/ २००९/ सातारा | श्री. संतोष शिवाजी क्षीरसागर बेंदकरवाडा, मु. लोणंद, ता.खंडाळा, जि. सातारा | जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा | जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा | विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे दि.८.१२.२००८ व दि.५.१.२००९ च्या पत्राच्या प्रती व सदर पत्रांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती | अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | २६५/ २००९/ सातारा | श्री. संभाजी दशरथ खोपडे मु.पो.आसले, ता.वाई, जि.सातारा | कक्ष अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, सातारा | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, सातारा | अनुकंपा तत्वावर केलेल्या चुकीच्या नियुक्त्यांसंदर्भात कार्यवाही करावी. | अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांचे दि. १५.४.२००९ चे आदेश योग्य आहेत. तसेच अपिलसोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ३ | २८६/ २००९/ सातारा | श्री. धनाजी दिनकर कदम मु.पो.सुर्ली, ता.कोरेगाव, जि.सातारा | ग्रामसेवक, सुर्ली, ता.कोरेगाव, जि.सातारा | गट विकास अधिकारी, कोरेगाव, पंचायत समिती, कोरेगाव, जि.सातारा | सन २००४ ते २००८ या आर्थिक वर्षातील सुर्ली ग्रामपंचायतीच्या लेखा परीक्षण अहवालाच्या प्रती | अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १४९/ २००९ / सातारा | श्री. संजय कोंडीबा गाडे मु.पो.कुसुंबी, ता.जावली, जि.सातारा | जन माहिती अधिकारी (माध्यमिक शिक्षण), जिल्हा परिषद, सातारा | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा | मुख्याध्यापक पदाकरीता दाखल केलेल्या अनुभव व प्रमाणपत्रांच्या नकला | १. अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत.<br>२. प्रथम अपील केलेले दिसून येत नाही. |
| ५ | १५०/ २००९/ सातारा | श्री. सुशांत सुभाष मोरे ४, केशर कॉम्प्लेक्स, ३४ पंताचा गोट, सातारा | सचिव, महाराष्ट्र फॉंडेशन फॉर एज्युकेशन, कराड, ता.कराड, जि.सातारा | अध्यक्ष, महाराष्ट्र फॉंडेशन फॉर एज्युकेशन, कराड, ता.कराड, जि.सातारा | महाराष्ट्र फॉंडेशन फॉर एज्युकेशन, कराड, ता.कराड, या संस्थेचे प्रोसीडिंग बुक, नोटीस बुक, किर्दी, खतावणी इ. कागदपत्रांच्या प्रती | अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ६ | १५१/ २००९ / सातारा | श्री. प्रताप किसन वाघ मु.पो कोडोली (चंदननगर), ता.जि. सातारा | शिक्षण उप संचालक, यांचे कार्यालय , कोल्हापूर | शिक्षण उप संचालक, कोल्हापूर | दि. १३ व २१.८.२००७ च्या पत्रानुसार चौकशी अहवाल. श्री. पा.य. सावंत व श्री. संजय गाडे यांनी केलेल्या तक्रारीनुसार चौकशी अहवाल शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सातारा यांच्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती | जन माहिती अधिकारी यांचे दि. ९.१२.२००८ चे उत्तर योग्य आहे. |
| ७ | १५५/ २००९ / सातारा | श्री.काकासाहेब मलकार्जुन शिवशरण प्लॉट नं.७०, अर्कशाळा नगर, सातारा | उप कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, सातारा | कार्यकारी अभियंता,. मार्ग प्रकल्प विभाग, सातारा | कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी स्थावर जंगम मालमत्ता खरेदी करण्यापूर्वी अथवा खरेदी केल्यानंतर परवानगी घेतली असल्यास त्या कागदपत्रांच्या प्रती | अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | १५७/ २००९/ सातारा | श्री.काकासाहेब मलकार्जुन शिवशरण | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सातारा यांचे कार्यालय, सातारा | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सातारा | कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी स्थावर जंगम मालमत्ता खरेदी करण्यापूर्वी अथवा खरेदी केल्यानंतर परवानगी घेतली असल्यास त्या कागदपत्रांच्या प्रती | अपिलीय प्राधिकाऱ्यांचा निर्णय योग्य आहे. |
| ९ | १५८/ २००९ / सातारा | श्री.काकासाहेब मलकार्जुन शिवशरण | अधीक्षक, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा विभाग, सातारा | अधीक्षक, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा विभाग, सातारा | कार्यालयातील अधिकारी /कर्मचारी यांनी स्थावर जंगम मालमत्ता खरेदी करण्यापूर्वी अथवा खरेदी केल्यानंतर परवानगी घेतली असल्यास त्या कागदपत्रांच्या प्रती | अपिलीय प्राधिकाऱ्यांचा निर्णय योग्य आहे. |
| १० | १५९ / २००९ / सातारा | श्री. राजेजीराव विठ्ठलराव नाईक - निंबाळकर गोळीबार मैदान, फलटण, जि.सातारा | निवासी नायब तहसीलदार, फलटण, ता. फलटण, जि. सातारा | तहसीलदार, फलटण, ता. फलटण, जि. सातारा | तहसीलदार यांच्या दि.१८.७. २००२ च्या आदेशाची साक्षांकित प्रत | यापूर्वी अशा अपील अर्जावर निर्णय झाला आहे. तोच या प्रकरणीही लागू आहे. वारंवार अपिले/ अर्ज करून सर्व यंत्रणांचा वेळ घालविण्याची अपीलकर्त्याची कृती अयोग्य आहे. अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ११ | १६१/ २००९ / सातारा | श्री. प्रवीण आनंदराव भोसले ८८ब, गोळीबार मैदान, गोडोली, सातारा | निवासी नायब तहसीलदार, हवेली, ता. हवेली, जि. पुणे | तहसीलदार, हवेली, ता. हवेली, जि. पुणे | मु.पो.खराडी (चंदननगर), ता. हवेली, जि. पुणे येथील सौ.शैलाबाई आनंदराव भोसले यांच्या नावे असलेला प्लॉट नं.५३/१ बाबतची संपूर्ण माहिती (७/१२ उतारे) | १.भूखंडाच्या ७/१२ बाबत संबंधित कार्यालयाच्या नियमावलीप्रमाणे अर्ज करावा. २. जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अनु. क्र. १ ते ११ अपिले ( क्र. २६२/२००९/सातारा, २६५/२००९/सातारा, २८६/२००९/सातारा, १४९/२००९/सातारा, १५०/२००९/सातारा, १५१/२००९/सातारा, १५५/२००९/सातारा, १५७/२००९/सातारा, १५८/२००९/सातारा, १५९/२००९/सातारा व १६१/२००९/सातारा ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. १५९/२००९/सातारा संदर्भात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती देण्याबाबत नमूद /आदेशित केले आहे, त्यानुसार संबंधित अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती देऊन अनुपालन अहवाल आयोगास आठ दिवसात सादर करावा. अशी पूर्तता न केल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे शास्ती व तद्नुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दि. २९.६.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २६५६-अ /पुणे | श्री.असगर सैफुद्दीन बोहरी सैफ हार्डवेअर स्टोअर, एम.जी.रोड, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे | माहिती अधिकारी, नगररचना विभाग, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, जि.पुणे | मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, जि.पुणे | लोणावळा डी-वॉर्ड, घर क्र.५९ व ६० मध्ये ५ लोकांना बांधकाम व परवानगीबाबत माहिती मिळणेबाबत | १) जन माहिती अधिकारी यांचा दि.०६.०९.०८ रोजीचा निर्णय योग्य आहे. २) वॉर्ड क्र.डी ५९,६०,६१ मधील बांधकामाबाबत, नळकनेक्शनबाबत, संडास खोली इ.बाबतची माहिती जन माहिती अधिकाऱ्यानी अपीलकर्त्यास १० दिवसात द्यावी. |
| २ | २८९८/पुणे | श्री.हेमेंद्र रामचंद्र मांजरे स.नं.२३-क, प्लॉट क्र.५, रस्ता क्र.७, मधुबन हौ.सो., जुनी सांगवी, पुणे-२७ | दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, पुष्पा मंगल कार्यालय, २ रा मजला, बिबवेवाडी, पुणे | दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, पुष्पा मंगल कार्यालय, २ रा मजला, बिबवेवाडी, पुणे | मूळ दस्तऐवज मिळणेबाबत | १) ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. २) दस्तऐवजाबाबत संबंधित प्रचलित नियमावलीनुसार अर्ज करावा. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २८९९/पुणे | श्रीमती शैला धोंडिबा बलकवडे ३२४, शिवाजीनगर, गावठाण, पुणे-५ | वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय पौड, ता.मुळशी, जि.पुणे | उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ, पुणे-१ | श्रीमती बलकवडे यांना गर्भपात विशेष रजा मंजूर होऊनही पगार अदा न करण्याचे कारण व तत्संबधी माहिती | संबंधितांच्या पगाराबाबत वस्तुस्थितीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी. |
| ४ | २९००/पुणे | श्री.मुकेश सुरेश चव्हाण रा.सर्व्हे नं.२२/१/१, समर्थ हॉस्पिटल जवळ, भूमकर किराणा लाईन, थिटे वस्ती,खराडी, पुणे -१४ | परिमंडळ अधिकारी "ड" विभाग, शिवाजीनगर, पुणे -५ | सहायक अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे, ऐ बॅरेक, सेंट्रल बिल्डिंग, पुणे-१ | श्री.हरीष गुप्ता यांच्या दि.०१.१०.०८ रोजीच्या शिधा वाटप कार्ड मिळण्यासाठी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने व इतर कागदपत्रांच्या नकला | १) जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली आहे, २) प्रथम अपिलाचा निर्णय विहित मुदतीत देण्याची समज अपिलीय प्राधिकारी श्री.आर.पी.महामुनी यांना देण्यात येत आहे. |
| ५ | २९०१/पुणे | श्री.बलभीम गोविंद शिराळकर मु.पो.भिगवण, ता.इंदापूर, जि.पुणे | गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद पुणे, पुणे १ | कोर्ट निर्णयाप्रमाणे पेन्शन बसविणेबाबत | अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २०००५ अंतर्गत येत नाही. |
| ६ | ३०८८/ पुणे | श्री.नितीन प्रभाकर शेलार ३१, साधना हौसिंग सोसायटी, आकाशवाणी जवळ, हडपसर, पुणे -२८ | पोलीस निरीक्षक, हडपसर पोलीस स्टेशन, पुणे -२८ | पोलीस उपआयुक्त घरिमंडळ क्र.४, पुणे शहर, पुणे | दि.०४.०६.०८, २५.०६.०८ रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कारवाई व चौकशीची मागणी व माहिती | अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २०००५ अंतर्गत येत नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ३०९८/पुणे | श्री.नंदकुमार मनोहर पानसरे ७९०, वेताळपेठ, भोर, जि.पुणे | सपोअ, प्रशासन व माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर,पुणे | पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र.४, पुणे शहर, पुणे | अक्षवंत नंदकुमार पानसरे चेस्ट क्र.०९०९२ अर्ज क्र.००५०३ यांना पोलीस भरती पुणे येथे नाकारल्याबा-बत खुलासा | १) प्रशासकीय कार्यवाहीची मागणी असून ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. २) जन माहिती अधिकारी यांनी संबंधिताबाबतच्या निर्णयाच्या वस्तुस्थितीसह निवड प्रक्रियेची माहिती व खुलासा १५ दिवसात आयोगास सादर करावा. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ७ (क्रमांक २६५६-अ, २८९८, २८९९, २९००, २९०१, ३०८८ व ३०९८ ) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र. २६५६-अ, ३०८८ व ३०९८ मध्ये जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी आयोगाने विहित केलेल्या कालावधीत अपिलकर्त्यास माहिती देऊन त्यांनी केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल दि.१५.०७.२००९ पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दिनांक :२५ -०६-२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ